महाराष्ट्र राज्य सिंधी साहित्य अकादमीचे सन २०२४-२५ या वर्षाचे पुरस्कार घोषित करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,**
**शासन निर्णय क्र. सिंसाअ ७२२५/प्र.क्र.११८/सां.का.४**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक: ०५ मार्च, २०२५

**संदर्भ** :- १) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्र. सिंसाअ ७२१६(१४)/प्र.क्र.२३१/सां.का.४, दि. १ एप्रिल, २०१६.
२) सहसंचालक, महाराष्ट्र राज्य हिंदी, सिंधी, गुजराती यांचे पत्र क्र. जा.क्र./मरासिंसाअ/२८५-२८६/२०२५, दि.२४/०२/२०२५.

**प्रस्तावना :-**

सिंधी भाषेच्या प्रचार - प्रसारासाठी महाराष्ट्र राज्य सिंधी साहित्य अकादमीची उपर्निर्दिष्ट क्र १ अन्वये नियमावली निर्गमित करण्यात आलेली आहे. या नियमावलीनुसार महाराष्ट्र राज्य सिंधी साहित्य अकादमीच्या योजनांपैकी पुरस्कार योजना ही अत्यंत महत्त्वपूर्ण योजना असून सदर योजनेन्वये सिंधी साहित्य क्षेत्रात मोलाचे कार्य व भरीव कामगिरी योगदान देणाऱ्या साहित्यिकांना तसेच प्रतिवर्षी उत्कृष्ट वाङमय निर्मितीकरिता लेखकांना उत्तेजन देण्यासाठी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. त्या अन्वये महाराष्ट्र राज्य सिंधी साहित्य अकादमीद्वारे सन २०२४-२५ या वर्षाकरिता निवडण्यात आलेल्या पुरस्कारार्थी यांच्या नावास व पुरस्कार रक्कमेस मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्य सिंधी साहित्य अकादमीच्या २०२४-२५ या आर्थिक वर्षातील पुरस्कारार्थी व संबंधित पुरस्कार रक्कम रू. ७,५०,०००/- (अक्षरी रुपये सात लक्ष पन्नास हजार फक्त) या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. पुरस्कारार्थी व पुरस्कारांची रक्कम बाबतचा सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे आहे:-

| अ.क्र. | पुरस्काराचे नाव | पुरस्कार संख्या | पुरस्कार रक्कम | पुरस्कार विजेत्याचे नाव | पुस्तकाचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | अखिल भारतीय जीवन गौरव सन्मान पुरस्कार | १ | २,००,०००/- | डॉ. जगदिश लच्छानी | .... |
| २ | सिंधी साहित्य क्षेत्रातील पुस्तक/ ग्रंथांना साहित्य/ वाङ्मय पुरस्कार | ४ | १,००,०००/- | श्री. निरंजन असरानी | टि-पताई हिक नाटककार जे हथ जी |
| | | | १,००,०००/- | श्रीमती तमन्ना मतलाणी | सिंधीयत जी ज्योति |
| | | | १,००,०००/- | डॉ. रोमा जैसिंघाणी | खुदा सूहं ऐं औरत जा राबिता |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | १,००,०००/- | श्रीमती प्रिया सितपाल | अधुरी ख्वाहिश |
| ३ | पत्रकारिता पुरस्कार | १ | रु. ५०,०००/- | श्री विनोद पंजवानी | डेली नगर न्युज - दैवृतपत्र |
| ४ | काव्य पुरस्कार | १ | रु. ५०,०००/- | श्रीमती नैना मोटवानी | गुगधम एहसास |
| ५ | नवोदित साहित्यिक पुरस्कार | १ | रु. ५०,०००/- | श्रीमती इंद्रा हिरदानी | जिंदगी हिक सफरू |
| | **एकूण** | ८ | **७,५०,०००/-** | | |

०२. सदरचा खर्च हा मागणी क्र.झेडडी-२ प्रधानलेखाशीर्ष-२२०५ कला व संस्कृती, १०२ कला व संस्कृती यांचे प्रचालन (०८) (०१) सिंधी अकादमीची आस्थापना (कार्यक्रम) (२२०५ १६९७) ०५ - बक्षिसे या लेखाशिर्षाखाली सन २०२४-२५ या आर्थिक वर्षी उपलब्ध असलेल्या अनुदानातून “सर्शत” मंजूर करण्यात येत आहे.

०३. यासाठी, सहसंचालक, महाराष्ट्र राज्य हिंदी, सिंधी, गुजराती साहित्य अकादमी यांना नियंत्रण अधिकारी तसेच आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

०४. सदर खर्चास वित्त विभाग शासन निर्णय क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/विनिमय, भाग-२, दि.१७ एप्रिल, २०१५, उपविभाग ३, अ.क्र. ४ परिच्छेद क्र. २७(२) (अ) अन्वये प्रशासकीय विभागास प्राप्त अधिकारानुसार मान्यता देण्यात येत आहे.

०५. सदर प्रकरणी वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२४/ प्र.क्र.८०/ अर्थ-३, दि. २५ जुलै, २०२४ व दि. १२ फेब्रुवारी, २०२५ मधील सर्व परिच्छेद परीशिष्टातील अटींनुसार कार्यवाही करण्याची जबाबदारी सहसंचालक, महाराष्ट्र राज्य हिंदी, सिंधी, गुजराती साहित्य अकादमी, मुंबई यांची राहील.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०२५०३०५१५००५१४५२३ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**( बाळासाहेब ईश्वर सावंत )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१.मा. मंत्री ( सांस्कृतिक कार्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

२. अपर मुख्य सचिव, सांस्कृतिक कार्य यांचे स्वीय सहाय्यक, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
३. उप सचिव ( सां.का.) यांचे स्वीय सहाय्यक, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
४. सह संचालक, महाराष्ट्र राज्य हिंदी, सिंधी, गुजराती साहित्य अकादमी, ओल्ड कस्टम हाऊस, विकास विभाग इमारत, शहिद भगतसिंग मार्ग, मुंबई ४०० ००१.
५. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
८. महालेखापाल (लेखा परीक्षा) - १ महाराष्ट्र, मुंबई
९. महालेखापाल (लेखा परीक्षा) - २ महाराष्ट्र, नागपूर
१०. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) - १ महाराष्ट्र, मुंबई
११. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)- २ महाराष्ट्र, नागपूर
१२.निवड नस्ती, सां.का.४.